महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ


४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१

Website - www.msbsd.edu.in Email - secretary@msbsde.edu.in दुरध्वनी क्र. ०२२-२६४७४४३५


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक

परिपत्रक क्र.: का.क्र. ०१/मान्यता/२०२२/१०५३

दिनांक: १९.०७.२०२२

विषय: प्रशिक्षण वर्ष २०२१-२२ पासुन शासन मान्यताप्राप्त संस्थांना प्रशिक्षण वर्ष २०२२-२३ पासुन संलग्नता नूतनीकरण मान्यता देण्याबाबत...

संदर्भ:

१. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.१८२/कौशल्य-२, दि.१७.०१.२०२२
२. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.०४/कौशल्य-२, दि.१८.०१.२०२२
३. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.११/कौशल्य-२, दि.२१.०१.२०२२
४. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.१२/कौशल्य-२, दि.२१.०१.२०२२
५. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.१३/कौशल्य-२, दि.२१.०१.२०२२
६. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.१८२(१)/कौशल्य-२, दि.२१.०१.२०२२
७. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.०९/कौशल्य-२, दि.२५.०१.२०२२
८. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.१८/कौशल्य-२, दि.२१.०२.२०२२
९. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.२०/कौशल्य-२, दि.२१.०२.२०२२
१०. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.२१/कौशल्य-२, दि.२१.०२.२०२२
११. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.३०/कौशल्य-२, दि.०७.०४.२०२२
१२. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.३१/कौशल्य-२, दि.०७.०४.२०२२
१३. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.३२/कौशल्य-२, दि.०७.०४.२०२२
१४. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.३३/कौशल्य-२, दि.०७.०४.२०२२
१५. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.४८/कौशल्य-२, दि.०७.०४.२०२२
१६. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.४९/कौशल्य-२, दि.०७.०४.२०२२
१७. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.५०/कौशल्य-२, दि.०७.०४.२०२२
१८. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.५२/कौशल्य-२, दि.०७.०४.२०२२
१९. शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२२/प्र.क्र.४७/कौशल्य-२, दि.२१.०४.२०२२
२०. मंडळाचे परिपत्रक क्र. का.क्र.०१/मान्यता/२०२१-२२/१५१, दि.३१.०१.२०२२

१. उपरोक्त शासन निर्णयानुसार प्रशिक्षण वर्ष २०२१-२२ पासुन नवीन संस्थेत नवीन अभ्यासक्रम, जुन्या संस्थेत नविन अभ्यासक्रम सुरु करणे व जुन्या संस्थेत तुकडी वाढ करणे करीता शासन मान्यता देण्यात आली आहे.

२. उपरोक्त शासन निर्णयानुसार ज्या संस्थांना शासन मान्यता देण्यात आली आहे व ज्या संस्थांनी अनामत रक्कमेचा भरणा विहित मुदतीत केला होता अशा संस्थांना प्रशिक्षण वर्ष २०२१-२२ पासुन विद्यार्थी प्रवेशाकरिता मंडळाव्दारे मान्यता देण्यात आली आहे.

३. तथापि, उपरोक्त शासन निर्णयानुसार ज्या संस्थांना शासन मान्यता देण्यात आली आहे परंतु त्या संस्थांनी अनामत रक्कमेचा भरणा विहित दिनांकापूर्वी केला नाही त्या संस्थांना विद्यार्थी प्रवेशाकरिता मंडळाव्दारे मान्यता देण्यात आलेली नाही.

४. उपरोक्त शासन निर्णयातील अटी व शर्ती नुसार शासनाने मान्यता दिलेल्या संस्थांनी निर्धारित प्रशिक्षण वर्षात प्रशिक्षण सुरु न केल्यास सदर संस्थेची मान्यता आपोआप रद्द करण्यात येईल असे नमूद आहे.

५. उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रशिक्षण वर्ष २०२१-२२ पासुन संस्थांना मान्यता देण्यात आली आहे तथापि, तत्कालिन परिस्थितीत बहुतांश उमेदवारांनी अन्यत्र प्रवेश घेतले असल्याने संस्थांना विद्यार्थी प्रवेशास तसेच अनामत रक्कमेचा भरणा करण्यास पुरेशा कालावधी मिळाला नसल्याने प्रशिक्षण वर्ष २०२२-२३ पासुन संलग्नता देण्याबाबत व प्रवेशास मान्यता देण्याबाबत संस्थांनी मंडळाकडे विनंती केली आहे.

६. सदर संस्थांच्या विनंतीचा व तत्कालिन परिस्थितीचा विचार करून उपरोक्त नमुद शासन निर्णयान्वये शासन मान्यता प्राप्त सर्व संस्थांनी, ज्यांनी अनामत रक्कम भरलेली आहे अथवा अनामत रक्कम भरलेली नाही अशा सर्व संस्थांना प्रशिक्षण वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षाच्या संलग्नता नूतनीकरण मान्यता मिळण्यासाठी अर्ज करण्याची मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर कार्यपध्दती व कालमर्यादा खालील प्रमाणे असेल:

६.१. मंडळाने सद्यस्थितीत १ प्रशिक्षण वर्षाकरीता संलग्नता नूतनीकरण शुल्क निर्धारित केले आहे. सबब, ३ प्रशिक्षण वर्षाकरीता संलग्नता नूतनीकरणासाठी एकत्रित ३ वर्षासाठी संलग्नता नूतनीकरण शुल्क मंडळाचे खालील बँक खात्यात जमा करण्यात यावे

| | |
|---|---|
| **Account Holder Name:** | **MSBSVET** |
| **Bank:** | **HDFC BANK LTD** |
| **Branch:** | **KALHER BHIWANDI** |
| **Account Number:** | **501 00 506 165 732** |
| **IFSC:** | **HDFC0006198** |

६.२. मंडळाच्या उपरोक्त नमुद बँक खात्यात केवळ NEFT/ RTGS/ IMPS/ Internet Banking/ Online Payment Gateway च्या माध्यमातुनच संलग्नता नूतनीकरण शुल्क जमा करण्यात यावे. रोख अथवा चेक स्वरुपात संलग्नता नूतनीकरण शुल्क जमा करण्यात येवू नये व असे जमा केलेले संलग्नता नूतनीकरण शुल्क ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

६.३. संलग्नता नूतनीकरण शुल्क जमा करतांना Transaction Remark मध्ये <संस्था कोड>_Renewal नमुद करावा. उदा. ०२०४४ हा संस्था कोड असलेल्या संस्थेस संलग्नता नुतनीकरण शुल्क जमा करावयाचे असल्यास Transaction Remark मध्ये "०२०४४_ Renewal" असे नमुद करावे.

६.४. संस्थांनी संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्याकडे दि.२५.०७.२०२२ पर्यंत संलग्नता नूतनीकरणासाठी विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

६.५. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्याकडे संलग्नता नूतनीकरणासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची काळजीपूर्वक छाननी करून संस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात यावे. प्रत्यक्ष निरीक्षणासाठी शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच मंडळांतर्गत मान्यताप्राप्त संस्थेतील संबंधित अभ्यासक्रमातील तज्ञ निदेशक/ शिक्षक यांचा समावेश असलेली एक समिती नियुक्त करण्यात यावी.

६.६. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्या द्वारे कोणत्याही कारणास्तव संलग्नता नूतनीकरण नाकारण्यात येण्यापूर्वी संबंधित संस्थेस संलग्नता नूतनीकरणाच्या अर्जातील त्रुटी, दस्तऐवजात मधील त्रुटी, प्रशिक्षण सुविधांमधील त्रुटी, इत्यादी दूर करण्यासाठी व संलग्नता नूतनीकरण शुल्क भरणे यासाठी मुदत देण्यात यावी. तसेच, मुदत देऊन देखील त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या संस्थांची संलग्नता नूतनीकरण नाकारण्यात येणाऱ्या कारणांसहित संबंधित संस्थेस संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्याकडून कळविण्यात यावे.

६.७. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांनी संबंधित प्रादेशिक कार्यालय यांच्यामार्फत मंडळाकडे शिफारशींसह प्रस्ताव दि.३०.०७.२०२२ पूर्वी सादर करावे.

६.८. मंडळाकडे संलग्नता नूतनीकरणासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची समितीमार्फत छाननी करून तीन प्रशिक्षण वर्ष कालावधीसाठी संलग्नता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल.

६.९. मंडळाकडे दि.३०.०७.२०२२ पर्यंत संलग्नता नूतनीकरणासाठी शिफारशीसह प्राप्त झालेल्या प्रस्तावांना प्रवेश वर्ष २०२२ मध्ये प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात येईल.

६.१०. तथापि, मंडळाकडे दि.३०.०७.२०२२ नंतर संलग्नता नूतनीकरणासाठी शिफारशींसह प्राप्त झालेल्या प्रस्तावांना प्रवेश वर्ष २०२३ मध्ये प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात येईल.

६.११. मंडळाचे संदर्भीय परिपत्रक क्र. २० अन्वये प्रवेश सत्र २०२१ पासुन Supernumory पध्दत बंद करण्यात आली असुन Supernumory अंतर्गत देण्यात येत असलेल्या अतिरिक्त ५ प्रवेश क्षमता मुळ प्रवेश क्षमतेत समाविष्ट करण्यात आली आहे. सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता २५ वरुन ३० करण्यात आली आहे. सबब, Supernumory अंतर्गत वाढिव प्रवेश क्षमतेसाठी संस्थांना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

उपरोक्त प्रमाणे प्रशिक्षण वर्ष २०२१-२२ पासुन शासन मान्यताप्राप्त संस्थांना प्रशिक्षण वर्ष २०२२-२३ पासुन संलग्नता नूतनीकरणासंबंधी कार्यपध्दती व कालमर्यादेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(योगेश सुरेश पाटील)
संचालक

**प्रत: माहितीसाठी**

१. मा. प्रधान सचिव, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मुंबई ३२
२. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१

**प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

१. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय (सर्व)
३. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या मान्यता प्राप्त व इच्छुक संस्था (सर्व)
४. संगणक विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता) व निवडनस्ती